प्रेस नोट

लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५

लेखी परीक्षा

दिनांक ०५.०४.२०२६

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस भरती सन २०२४-२०२५ च्या जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय **चालक पोलीस शिपाई** यांची (१६) पदे भरण्यासाठी पहिल्या टप्यात उमेदवारांची **"शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणी "** ही दिनांक ११.०२.२०२६ ते २३.०२.२०२६ या कालावधीत व **" वाहन कौशल्य चाचणी "** दिनांक ०४.०३.२०२६ ते ०७.०३.२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात आली आहे.

चालक पोलीस शिपाई पदासाठीच्या शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणीत व वाहन कौशल्य चाचणीत उत्तीर्ण होवुन लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या (२६२) उमेदवारांचे गुणांची गुणवत्ता यादी दि.२०.०३.२०२६ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदरहु प्रसिध्द करण्यात आलेल्या **चालक पोलीस शिपाई पदासाठीच्या सदर गुणवत्ता यादीतील (२६२) उमेदवारांची लेखी परीक्षा हि दिनांक ०५.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर लेखी चाचणीसाठी (२६२) पैकी (२४१) उमेदवार हे हजर राहिले असुन, (२१) उमेदवार हे लेखी चाचणीसाठी गैरहजर होते.**

दिनांक ०५.०४.२०२६ रोजी चालक पोलीस शिपाई पदासाठीची घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेची **" तात्पुरती उत्तरतालिका (Provisional Answer Key)" ही दिनांक ०५.०४.२०२६ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात येवुन, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील बाहेरील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे. सदर नमुना उत्तरतालिके बाबत उमेदवारांचे **काही आक्षेप** असल्यास त्यांनी सदरचे आक्षेप २४ तासाचे आत या कार्यालयाचे **ई-मेल आयडी sp.latur@mahapolice.gov.in** वरती तसेच **पोलीस नियंत्रण कक्ष, लातूर येथील दुरध्वनी क्रमांक ०२३८२-२४२२९६ वरती नोंदविण्यात यावेत.** यानंतरने प्राप्त झालेल्या आक्षेपांचा कसल्याही प्रकारचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अमोल श्री तांबे (भापोसे)
पोलीस अधीक्षक, लातूर

प्रति,